**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अन्वये साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीस नवीन पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२५/ऊर्जा-४,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक: १२ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ :**

१) साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड यांचे क्र.साकोली-पी.टी.एल./ आय.एन.एस.टी. एस/अप्रोल/सेक्शन-६८/२०२५-२६/४३७१, दि.३०.१२.२०२५ रोजीचे पत्र.

२) मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम यांचे क्र.एम.एस.ई.टी.सी.एल./सी.ओ./सी.ई./ एस.टी.यु./टी.बी.सी.बी./०४१३, दि.१९.०१.२०२६ रोजीचे पत्र.

३) शासन निर्णय क्र. पावामो-२०२१/प्र.क्र.१७० (भाग-१)/ऊर्जा-४, दि.०२.११.२०२२ व दि.०१.१२.२०२२.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात सध्या वीजेची मागणी २९,००० मेगा वॅट इतकी वाढली असुन सन २०२६-२७ मध्ये सदर मागणी ३४,००० ते ३५,००० मेगा वॅट व सन २०३० मध्ये सदर मागणी ४२,००० ते ४५,००० मेगा वॅट पर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता वाढत्या वीजेच्या मागणीची पूर्तता करण्याकरिता पारेषण वाहिन्यांची क्षमता वाढविणे व पारेषण वाहिन्यांचे बळकटीकरण करणे अनिवार्य आहे. त्यानुषंगाने ४००/२२० के.व्ही., ४००/१३२ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिन्या उभारणी, वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया व्दारे (TBCB-Tariff Based Competitive Bidding) करणे नियोजित आहे. सबब, साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीकडून उभारण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ४००/२२० के.व्ही., ४००/१३२ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्र व याकरीता उभारण्यात येत असलेल्या संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिनीस विद्युत अधिनियम, २००३ च्या अंतर्गत कलम ६८ अन्वये पूर्व परवानगी प्रदान करण्याची विनंती शासनास करण्यात आली होती. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

४००/२२० के.व्ही., ४००/१३२ के.व्ही. साकोली उपकेंद्र (ए.आय.एस.) व संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी 'वीज दरावर आधारित स्पर्धात्मक निविदा' प्रक्रिया व्दारे (TBCB-Tariff Based Competitive Bidding) पारेषण सेवा पुरवठादार (TSV-Transmission Service Provider) बोलीधारकाची निवड करण्यासाठी REC Power Development and Consultancy Limited (RECPDCL) यांना बोली प्रक्रिया समन्वयक (BPC-Bid Process Coordinator) म्हणुन नियुक्त केले आहे. BPC ने साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड ही विशेष हेतूसाठी स्थापित केलेली संस्था (SPV) आहे.

साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीस वीजदरावर आधारित स्पर्धात्मक बोली निविदा प्रक्रिया राबवून ४००/२२० के.व्ही., ४००/१३२ के.व्ही. साकोली उपकेंद्र (ए.आय.एस.) व संबंधित जोड प्रणाली पारेषण वाहिन्या उभारण्याकरिता साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीस भारतीय विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अंतर्गत खालील अटी आणि शर्तींच्या अधीन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर वीज प्रकल्प उभारणी साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड स्वखर्चाने, विहित केलेल्या प्रमाणित पध्दतीने आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करेल. या वीज वाहिनीचा वापर कंपनीने ज्या प्रयोजनार्थ करावयाचा ठरविला आहे, केवळ त्याच प्रयोजनासाठी करणे कंपनीस बंधनकारक राहील.

२. सदर प्रकल्पाचे कामाचे स्वरुप व प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| Sr. No. | Scope of the Transmission Scheme |
|---|---|
| 1. | **Establishment of AIS Sakoli with 2 x 500 MVA, 400/220 kV ICTs & 2 x 315 MVA, 400/132 KV ICTs with 1 x 125 MVAr Bus Reactor at 400 kV level**<br>• 400/220 kV, 500 MVA, ICTS-02 Nos<br>• 400/132 kV, 315 MVA, ICTs-02 Nos.<br>• 400 KV ICT Bays-04 Nos.<br>• 220 kV ICT Bays-02 Nos<br>• 132 kV ICT Bays-02 Nos<br>• 400 KV Line Bays-04 Nos.<br>• 220 kV Line Bays-02 Nos.<br>• 132 kV Line Bays - 06 Nos<br>• 220 kV Transfer Bus Coupler-1 set<br>• 220 kV Bus Coupler-1 No.<br>• 132 kV Bus Coupler-1 No<br>• 132 kV Transfer Bus Coupler-1 set<br>**Future Space Provision:**<br>• 400/132 kV, 315 MVA, ICT-01 No<br>• 400 kV ICT Bay-1 No.<br>• 132 kV ICT Bay-1 No. |
| 2. | **LILO of Both circuit of 400 kV Wardha (PG)- Raipur (PG) 400 kV D/C line at 400 KV AIS Sakoli (New)** |
| 3. | **220 kV D/C line from 400 kV AIS Sakoli (New) to 220 kV Bhandara (existing)**<br>• 220 kV line end bays at 220 kV Bhandara (existing)-02 Nos |
| 4. | **132 KV D/C line from 400 KV AIS Sakoli (New) to 132 kV Deori (proposed)**<br>• 132 kV line end bays at 132 kV Deori (proposed)-02 Nos |
| 5. | **132 KV D/C line from 400 KV AIS Sakoli (New) to 132 kV Sakoli (existing)**<br>• 132 kV line end bays at 132 kV Sakoli (existing) 02. Nos |
| 6. | **132 kV D/C line from 400 KV AIS Sakoli (New) to 132 kV Morgaon Arjuni (existing)**<br>• 132 kV line end bays at 132 kV Morgaon Arjuni (existing) - 02 Nos |

३. या वीज वाहिन्या कार्यान्वित करण्यापूर्वी / प्रभारीत करण्यापूर्वी याबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून यथास्थिती मुख्य विद्युत निरिक्षक / मुख्य अभियंता (विद्युत) यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

४. वीज वाहिन्यांचे संचलन व व्यवस्थापन साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड ही कंपनी स्वत: करेल.

५. वीज वाहिनी उभारल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या / संबंधित जागा मालकांच्या जर काही तक्रारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांसमवेत विचारविनिमय करून त्या तक्रारींचे योग्यरित्या निराकरण करण्याची जबाबदारी साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड यांची असेल.

६. सदर वीज वाहिनी उभारणे व कार्यान्वित ठेवणे यानुषंगाने आवश्यक असलेले सर्व परवाने मिळवणे, विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणे. तसेच, शासनाच्या विविध प्राधिकरणे / विभाग / वीज नियामक आयोग इत्यादींचे इतर प्रचलित नियम त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम व अटी शर्ती कंपनीवर बंधनकारक राहतील.

७. सदर परवान्याचा कालावधी परवाना पत्र दिल्यापासून ३५ वर्षांचा असेल, उक्त कालावधी संपुष्टात आल्यानंतर शासन सदर वाहिनीबाबत उचित आढावा घेऊन निर्णय घेईल.

८. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ मधील अटी व शर्ती व त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल, या विभागाचे शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७० (भाग-१)/ऊर्जा-४, दि.०२.११.२०२२ व दि.०१.१२.२०२२ मधील नमूद अटी व शर्ती तसेच राज्य शासन व केंद्र शासनाची अशा पारेषण वाहिन्या संबंधिची वेळोवेळी जाहीर झालेली/ होणारी धोरणे मार्गदर्शक सुचना या पारेषण वाहिन्यांस लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०२१२१११२५५२५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

UDDHAV RABHAJI DAHIPHALE

Digitally signed by UDDHAV RABHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Energy Department, 2.5.4.20=05B3CA49B9A0A924FD4D8743E6E254E742308F02108527986E098AFC27201F30, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D80774C9ED65ECA9BE69006934BFB5C4CA32AB0DC1A2EC5746398458BDF1C37, cn=UDDHAV RABHAJI DAHIPHALE
Date: 2026.02.12 11:14:23 +05'30'

**(उ. र. दहिफळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.
११) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१३) संचालक, साकोली पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, लोधी रोड, नवी दिल्ली.
१४) निवडनस्ती (ऊर्जा-४), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

*******************